दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • सोमवार दि.२० एप्रिल २०२६ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक २३१ • पाने ४ • किंमत ४ रुपये
Beed (Mahmar) Daily Marathi • Monday 20 April 2026 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 231 • Pages 4 • Rate 4 Rs

## ड्रग्स कुठून येतं? सरकारला माहिती नाही का?

**मुंबई**–पुणे, नाशिक आणि मुंबईसारख्या मोठ्या शहरांमध्ये अमली पदार्थांची वाढती विक्री हा गंभीर प्रश्न बनत चालला असून यावर मनसे नेते अमित ठाकरे यांनी तीव्र प्रतिक्रिया दिली आहे. राज्यात इतक्या मोठ्या प्रमाणात ड्रग्सची विक्री होत असताना हे नेमकं कुठून येतं, याचा सरकारला पत्ता नाही का? असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला. या मुद्द्यावर त्यांनी सरकारच्या कार्यक्षमतेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे.अमित ठाकरे यांनी सांगितले की, अमली पदार्थांचा व्यापार दिवसेंदिवस वाढत असून त्याची भीषणता आता उघडपणे दिसू लागली आहे. ज्या प्रमाणात ड्रग्स विकले आणि खरेदी केले जात आहेत, ते खरोखरच धक्कादायक आहे, असं ते म्हणाले. या वाढत्या प्रवृत्तीमुळे समाजावर, विशेषतः तरुण पिढीवर गंभीर परिणाम होत असल्याची चिंता त्यांनी व्यक्त केली.याहूनही गंभीर बाब म्हणजे शाळांच्या परिसरातही अमली पदार्थांची विक्री होत असल्याचा आरोप त्यांनी केला. शाळांच्या जवळच बेधडकपणे ड्रग्स विकले जातात, ही अत्यंत लाजिरवाणी बाब आहे, अशा शब्दांत त्यांनी संताप व्यक्त केला.

# आरोग्य सेवेत एआयचा वापर चिंतन शिबिराचे उद्घाटन

## दर्जेदार आरोग्य सेवेसाठी विभाग कटिबद्ध–राज्यमंत्री मेघना बोर्डीकर

**सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री मेघना साकोरे–बोर्डीकर यांनी आरोग्य सेवेत कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर करून नागरिकांना दर्जेदार सेवा देण्यासाठी आरोग्य विभाग कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन केले. राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाने आयोजित केलेल्या आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि आयुष्मान भारत डिजिटल मिशनच्या दोन दिवसीय राष्ट्रीय 'चिंतन शिबिरा'चे उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले.यावेळी राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुनील कुमार बर्नवाल, सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव ई. रविंद्रन, एकत्रित आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेचे राज्य मुख्य कार्यकारी अधिकारी अण्णासाहेब चव्हाण उपस्थित होते. देशातील विविध राज्यांतील आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी, तज्ज्ञ व धोरणकर्ते, तसेच आरोग्य विभागाचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने या शिबिरात सहभागी झाले होते.**

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यमंत्री साकोरे–बोर्डीकर यांनी सांगितले की, प्रतिबंध हाच आजार टाळण्यासाठी महत्त्वाचा उपाय आहे, त्यामुळे आरोग्य विभाग प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर अधिक भर देत आहे. नवीन तंत्रज्ञानामुळे आरोग्य क्षेत्रात मोठे बदल होत असून, त्याचा उपयोग नागरिकांना उत्तम आरोग्य सेवा देण्यासाठी केला जात आहे. महाराष्ट्र हे मेनोपॉज क्लिनिक सुरू करणारे देशातील पहिले राज्य ठरले आहे. जानेवारीपासून सुरू झालेल्या या क्लिनिकचा १७ हजारांहून अधिक महिलांनी लाभ घेतला आहे. या चिंतन शिबिराचा उपयोग पुढील दिशा ठरवण्यासाठी निश्चित होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. डॉ. बर्नवाल यांनी नमूद केले की, आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेमुळे नागरिकांचा आरोग्य सेवेवरील स्वतःच्या खिशातून होणारा खर्च लक्षणीयरित्या कमी झाला



आहे. या योजनेतून आतापर्यंत ११ कोटींहून अधिक रुग्णांवर उपचार झाले आहेत. एआयसारखे उदयोन्मुख तंत्रज्ञान गंभीर आरोग्य आव्हानांना सामोरे जाण्यास मदत करू शकते. आरोग्य क्षेत्रात एआयच्या वापरासाठी राष्ट्रीय धोरण विकसित केले जात असून, ते आरोग्य सेवेमध्ये सर्वसमावेशक वापरासाठी मार्गदर्शन करेल.शिबिराच्या पहिल्या दिवशी एबीपीएमजेएवाय व एबीडीएम अंतर्गत झालेल्या प्रगतीचा आढावा घेण्यात येणार आहे. की–परफॉर्मन्स इंडिकेटर्स (केपीआय), क्लेम्स डेटावर आधारित विश्लेषण, तसेच डिजिटल हेल्थ सुविधांची सादरीकरणे यामध्ये समाविष्ट आहेत. महाराष्ट्रासह झारखंड, गुजरात, कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि बिहार या राज्यांकडून त्यांच्या डिजिटल हेल्थ मिशनच्या अनुभवांवर सादरीकरण करण्यात येणार आहे.दुसऱ्या दिवशी आयटी अपडेट्स, एनएचसीएक्स सक्षम एचएमआयएस प्रणालीचे प्रात्यक्षिक, हेल्थ डेटा ॲनालिटिक्स युनिटचे निष्कर्ष सादर केले जाणार आहेत. यासोबतच एम्सद्वारे विकसित क्लिनिकल डिसिजन सपोर्ट सिस्टीमच्या अंमलबजावणीवर विशेष सत्र आयोजित करण्यात आले आहे. तसेच पीएमजेएवाय आयटी प्लॅटफॉर्मवरील विविध योजनांचे एकत्रीकरण, पीएम–राहत उपक्रम आणि वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये एबीडीएमची अंमलबजावणी यावरही सविस्तर चर्चा होणार आहे.

# सोनीजवळा ३३के व्ही सबस्टेशन संदर्भात लागणारे कागदपत्रे प्रशासनाकडे सुपूर्द

## मंजुरी मिळाल्याबद्दल शिवसैनिकांनी मानले आभार

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब,उप मुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे साहेब,उपमुख्यमंत्री सुनेत्राताई अजितदादा पवार,केज विधानसभा मतदारसंघाच्या आमदार नमिताताई मुंदडा, खासदार बजरंग बप्पा सोनवणे,शिवसेना जिल्हा प्रमुख सचिन (भैय्या)मुळूक,राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते रमेशराव आडसकर साहेब,शिवसेना विधान सभाप्रमुख दादासाहेब ससाणे,शिवसेना तालुका प्रमुख पृथ्वीराज पाटील, सोनीजवळा गावच्या सरपंच सौ.जान्हवीताई गोविंद ससाणे,सोनी जवळा ग्रामपंचायत चे आजी–माजी पदाधिकारी

केज तहसीलचे दिवंगत तहसीलदार



**शिवसेना विधानसभा प्रमुख दादासाहेब शंकरराव ससाणे यांनी जिल्हाप्रमुख सचिन भैय्या मुळूक यांच्या माध्यमातून वेळोवेळी महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री व सध्याचे उपमुख्यमंत्री मा.ना.श्री. एकनाथरावजी शिंदे साहेब व शासनाकडे व प्रशासनाकडे पाठपुरावा करून सातत्यपूर्ण प्रयत्न केला त्यामुळे सदरील सोनीजवळा येथील सब स्टेशनचे स्वप्न सत्यात उतरत आहे.**

राकेशजी गिड्डे साहेब,उप अभियंता सय्यद साहेब,कनिष्ठ अभियंता अंडील साहेब, मंडळाधिकारी हजारे साहेब,तलाठी वाघमारे मॅडम,कवडे मॅडम,व ग्रामसेवक श्री.राम चौरे व सर्व गावकरी यांच्या सहकार्यातून आज सोनी जवळा सबस्टेशन साठी लागणारे फायनल कागद पत्रे शासनाकडे सुपूर्द केले.लवकरच गोरगरीब शेतकऱ्यांचा जिव्हाळ्याचा प्रश्न मार्गी लागेल.शिवारातील शेतकऱ्यांना या सब स्टेशनचा फायदा होणार आहे या सबस्टेशनसाठी अहोरात्र सोनिजवळा ग्रामस्थांनी साथ दिली.

तसेच शासनाने सदरील सबस्टेशनला मंजुरी दिली त्याबद्दल शासनाचे गावकऱ्यांच्या वतीने जाहीर आभार तसेच प्रशासनातील अधिकारी कर्मचारी वर्गांनी देखील या कामासाठी मदत केली त्याबद्दल सर्वांचे आभार असे शिवाजी रामदास गायकवाड युवासेना उपतालुका प्रमुख केज यांनी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले आहे.

# केज तालुका शिवसेनेच्या वतीने महिला आरक्षण विधेयकाला विरोध करणाऱ्या कांग्रेसच्या विरोधात घोषणाबाजी




दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुका शिवसेनेच्या वतीने महिला आरक्षण विधेयकाला विरोध करणाऱ्या काँग्रेस पक्षाच्या विरोधात शिवसेनेच्या वतीने केज येथे माजी आमदार संगीताताई ठोंबरे, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक,तालुकाप्रमुख पृथ्वीराज पाटील यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसच्या विरोधात प्रचंड घोषणाबाजी करून निषेध आंदोलन करण्यात आले.यावेळी उपस्थित महिला आघाडी शहर प्रमुख वैशालीताई सांगळे,शितलताई सोनवणे,मुक्ताताई गडमवार,ज्ञानेश्वरीताई सांगळे,ज्येष्ठ शिवसैनिक अशोक जोगदंड,डॉक्टर संतोष बुडुक,तालुका सचिव विकास काशीद, उपतालुकाप्रमुख महिंद्र चाटे,उपतालुकाप्रमुख सुग्रीव बसवर,शेतकरी सेना तालुकाप्रमुख आदित्य रांजणकर, विभाग प्रमुख बाबासाहेब डोईफोडे, उपतालुकाप्रमुख योगेश देशमुख,युवा सेना उप तालुकाप्रमुख ज्ञानेश्वर भांगे,संजय गायके, शिवाजी मोहिते,मोहन ढाणे,पोपट लोंढे,संदीप नाईकवाडे,महेश कदम सह सर्व पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.

## मंजरथ येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित ह.भ.प.ज्ञानेश्वर वाबळे महाराज यांचे परिवर्तनवादी कीर्तनाचा कार्यक्रम



दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील मंजरथ येथे महामानव विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची २९ एप्रिल रोजी जयंती आयोजित केली असून या जयंतीनिमित विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे संध्याकाळी ठीक ७.३० वाजता महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध परिवर्तनवादी शिक्षणाचे महत्व पटवून देणारे,समतावादी विचार मांडणारे कीर्तनकार शिव, फुले, शाहू, आंबेडकरांचे पाईक ह. भ. प. ज्ञानेश्वर वाबळे महाराज यांचा कार्यक्रम जयंती समितीकडून ठेवण्यात आला आहे तरी हजारोच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन जयंती समिती व ग्रामस्थांकडून करण्यात आले आहे.

# पुणे येथे झालेल्या राज्यस्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धेमध्ये परिक्रमा तंत्रनिकेतनची कु.वैष्णवी शेंडगे ही विद्यार्थिनी राज्यात दुसरी

दैनिक वादळ वार्ता
**पुणे । प्रतिनिधी**

इंटर इंजीनिअरिंग डिप्लोमा स्टुडन्ट स्पोर्ट्स असोसिएशन राज्यस्तरीय स्पर्धा मध्ये समर्थ सणस मैदान पुणे. येथे संपन्न झालेल्या ॲथलेटिक्स या राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये परिक्रमा पॉलिटेक्निक चे कु.वैष्णवी शेंडगे,कु.अविनाश गावडे कु.अनुराधा धुमाळ हे एकूण ३ खेळाडू सहभागी झाले. मुलींमध्ये कु. वैष्णवी शेंडगे हिने २०० मीटर मध्ये द्वितीय क्रमांक मिळविला. व अतिशय चुरशीच्या स्पर्धेमध्ये खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत घवघवीत असे यश संपादन केले. आपले व महाविद्यालयाचे नाव राज्यामध्ये झळकावले.

या खेळाडूंचे परिक्रमा शैक्षणिक संकुलाचे संस्थापक, माजी मंत्री बबनराव पाचपुते, अध्यक्षा डॉ. सौ. प्रतिभाताई पाचपुते, सचिव आमदार श्री. विक्रमसिंह पाचपुते, मुख्य कार्यकारी अधिकारी ॲड. प्रतापसिंह पाचपुते, ॲकॅडमी डायरेक्टर सौ. इंद्रायणी पाचपुते, मुख्य अति. कार्यकारी अधिकारी प्रा. अनिल पुंड, अती. ॲकॅडमी डायरेक्टर संजिव कदमपाटील, तंत्रनिकेतन प्राचार्य डॉ.




प्रशांत सूर्यवंशी, इंजीनिअरिंग प्राचार्य मोहन धगाटे, एम.बी.ए. डायरेक्टर डॉ. सुदर्शन गिरमकर, फार्मसी प्राचार्य डॉ. सुनील निर्मळ, सायन्स कॉलेज प्राचार्य डॉक्टर पांडुरंग इथापे यांनी अभिनंदन केले. व उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

या खेळाडूंना परिक्रमा तंत्रनिकेतनचे प्राचार्य डॉ. प्रशांत सूर्यवंशी सर व शारीरिक शिक्षण संचालक प्रा. अशोक राहिंज यांचे मार्गदर्शन लाभले.

# हरवला आहे

**ज्ञानेश्वर चंद्रकांत शिंदे वय वर्षे १९ वर्ण रंग सावळा उंची पाच फूट नाक डबके डोळे मोठे काळे अंगात टी–शर्ट पॅन्ट नांदेड बोलीभाषा मराठी हिंदी नाकावर तीळ काळे केस वरील वर्णनाचा मुलगा दिनांक ३ एप्रिल २०२६ रोजी कापडे खरेदीसाठी म्हणून आपले राहते घर लाडका येथून निघून गेला आहे तरी वरील वर्णनाचा मुलगा सापडल्यास लवकरात लवकर खालील पत्त्यावर संपर्क करावे**

**:: संपर्क ::**
**चंद्रकांत विठ्ठल शिंदे रा लाडका ता कंधार जिल्हा नांदेड**
**मो.९०९६९७६५२६**
**संभाजी पाटील पवार**



**बेटकबिलोली**
**सापडून देणाऱ्यास योग्य ते बक्षीस देण्यात येईल**
**टिप: ज्ञानेश्वर जिथे असतील तेथून लवकर घरी ये आई–वडील खूप काळजी करत आहेत**

# भविष्यात डिजिटल मिडियाची भूमिका महत्वाची-ना.चंद्रशेखर बावनकुळे

## महाराष्ट्र राज्य डिजिटल मिडियाचे अधिवेशन व पुरस्कार वितरण सोहळा उत्सहात







**दैनिक वादळ वार्ता**
**सांगली । प्रतिनिधी**

कोविड काळात डिजीटल मिडियाने महत्वाची भूमिका बजावली आहे. त्यामुळे भविष्यात डिजीटल मिडियाच्या पाठिशी शासन राहणार आहे. वर्तमानामध्ये आणि भविष्यामध्ये डिजिटल माध्यमांचा विस्तार वाढला आहे. डिजिटल या नवीन स्तंभाची महाराष्ट्राला गरज आहे. सर्वच क्षेत्रात डिजीटल मिडियाचे महत्व अधोरीखित झाले आहे. केंद्र व राज्य शासनाच्या अनेक योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे डिजिटल मिडिया प्रभावी मिडिया आहे. डिजिटल मिडियाच्या सुरक्षेबाबत विचार केला जाईल. डिजिटल मिडियातील अनेक अडचणी काही समस्या तसेच आकस्मित निधीही द्यायचा आहे. काही मागण्यासाठी सकरात्मक आहोत लवकरच त्याबाबत निर्णय घेवू, असे आश्वासन महसूलमंत्री ना.चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.महाराष्ट्र राज्य डिजिटल मीडिया, मुंबई राज्य अधिवेशन व पुरस्कार वितरण सोहळा संजय भोकरे ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट मिरज येथे पार पडला. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ. मैनाक घोष, सिंधुदुर्गच्या जिल्हाधिकारी तृप्ती धोडमीसे, विशेष पोलिस महानिरीक्षक कोल्हापूर परीक्षेत्र सुनिल फुलारी, जिल्हा पोलिस प्रमुख संदीप घुगे तसेच जर्नालिस्ट असेसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वानखेडे , महाराष्ट्र राज्य डिजिटल मिडिया राज्य संघटक व महाराष्ट्र राज्य डिजिटल मिडिया प्रदेशाध्यक्ष सिध्दार्थ भोकरे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉक्टर विश्वास आरोटे.प्रदेश उपाध्यक्ष अशोक देढे.प्रदेश प्रसिद्धी प्रमुख नवनाथ जाधव.संजय फुलसुंदर आ. गोपिचंद पडळकर उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांच्याहस्ते जिल्हाधिकारी डॉ. मैनाक घोष, सिंधुदूर्ग जिल्हाधिकारी तृप्ती धोडमीसे, विशेष पोलिस महानिरीक्षक कोल्हापूर परीक्षेत्र सुनिल फुलारी, जिल्हा पोलिस प्रमुख संदीप घुगे, एबीपी माझाच्या कार्यकारी संपादक सरिता कौशीक, उद्योजक दिलीप कोटीभास्कर, प्रदेशाध्यक्ष -महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ स्वीकृत नगरसेवक-सोलापूर नगरपालिका मनीष केत, मुख्य प्रवक्ता भारतीय जनता पक्ष, नगरसेवक नवनाथ बन, ज्येष्ठ वैद्य डॉ. विनोद परमशेट्टी यांना पुरस्कार देवून सन्मान करण्यात आला. ना. चंद्रशेखर बावनकुळे पुढे म्हणाले, आज ज्या ज्या मान्यवरांना पुरस्कार मिळाले आहेत त्यांनी विकसीत भारत, समाज घडविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. पुरस्कारामुळे तुमची जबाबदारी वाढली आहे. तुमच्यामध्ये क्षमता आहे म्हणून तुम्हाला पुरस्कार मिळाला आहे. तुमच्या जीवनात चांगले काम करा. त्यामुळे समाज सुधारेल. समाज सुधारणी मध्ये आता डिजिटल मिडियाची महत्वाची भूमिका असणार आहे. बावनकुळे पुढे म्हणाले, डिजिटल मिडियाच्यामाध्यमातून सर्वच क्षेत्रात उपयोग होतो. डिजिटल मिडिया म्हणजे दुधारी शस्त्र आहे. हा कसोटीची काळ आहे. डिजिटल मिडियाच्या माध्यमातून चुकीची माहिती गेली तर कोणाचेतरी आयुष्य उध्दवस्त होवू शकतो. डिजिटल मिडियाची जेवढी क्रांती होईल ती गरज सरकारला आहे. डिजिटल मिडिया मोठा करताना काळजीही करावी लागणार आहे. विकसित भारत घडविताना मिडियाच्या माध्यमातून चांगली माहिती दिली पाहिजे. संजय भोकरे म्हणाले, ज्या सन्माननीय व्यक्तींना आपण पुरस्कार देतो. तो पुरस्कार कोणाच्याहस्ते घेतो हेही महत्वाचे असते. आयुष्य छान, थोडं लहान आहे, वेड्या लढण्यात छान आहे. अश्रूच यार माझा मधिरे समान आहे, काट्यातही फुलांची झुलती कमान आहे, हवे ते घे उचलून दुनिया दुकान आहे. कधी हसाव लागत तर कधी रडाव लागतं, सुंदर धबधब्यासाठी उंचावरून पडावं लागतं त्यासाठी प्रयत्नही महत्वाचं आहे. असे व्यक्तीमत्व ना.चंद्रशेखर बावनकुळे यांचे आहे. त्यांच्याहस्ते सर्वांना सन्मानित केले जात आहे. डिजिटल मिडियासाठी २ कोटींचा निधी दिला तर त्याच्या व्याजातून अनेकांना मदत मिळेल, अशी मागणीही ना.चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली.यावेळी डिजिटल मिडियातील काही पदाधिकार्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. अतिशय नियोजनबध्द कार्यक्रम पार पडला. लातूर, मुंबई, पुणे, सोलापूर, नांदेड आदी जिल्ह्यातून डिजिटल मिडियाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

### संवेदनशिलता माणुसकी जपले पाहिजे

**संवेदनशिलता माणुसकी जपले पाहिजे जेथे चूक आहे ते बोललेच पाहिजे. डिजिटल मिडियामुळे १२ सेकंदात बातमी सर्वत्र जाते. डिजिटलमिडियाची क्रांती २०१४ मध्ये झाली. डिजिटल मिडिया हा अत्यंत महत्वाचा बनला आहे. केंद्राच्या आणि राज्याच्या महत्वाच्या योजना या लक्षात सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविला जातो. आकस्मिक निधीसाठी फंड दिला जाईल.**

**– ना.चंद्रशेखर बावनकुळे**

# हदगाव पंचायत समितीमध्ये कर्मचाऱ्यांची गैरहजेरी गटविकास अधिकारी यांचा वचक नाही

**दैनिक वादळ वार्ता**
**हदगांव । प्रतिनिधी**




ग्रामीण भागाचा कणा समजल्या जाणाऱ्या पंचायत समितीमध्ये गुरुवारी ग्रामीण भागातील आपली विविध कामे घेऊन आले असता बहुतांश अधिकारी , कर्मचारी गैरहजर होते विशेष बाब म्हणजे गटविकास अधिकारी त्यांच्या कक्षाला सुद्धा कुलूप लावलेले होते . त्यामुळे पंचायत समितीच्या कामानिमित्त ग्रामीण भागातून आलेल्या नागरिकांची हेळसांड झाली यावेळी ग्रामीण भागातून आलेल्या नागरिकांची गैरसोय झाल्याने नागरिक संतप्त झाले होते, गटविकास अधिकारी दशरथ आडेराघो यांच्या कक्षाला सुध्दा कुलूप लावलेले होते , तसेच कृषी विभाग , पाणीपुरवठा विभाग, बांधकाम विभाग, पशुसंवर्धन विभाग, लेखा शिक्षण विभागामध्ये कुणीही अधिकारी कर्मचारी हजर नव्हते , विषेश बाब म्हणजे शासकीय कर्मचाऱ्यांसाठी कार्यालयीन वेळ सकाळी ९:४५ ते सायंकाळी ६:१५ पर्यंत कार्यालयात उपस्थित राहण्याचे वेळ निश्चित करण्यात आली त्यानुसार कर्मचाऱ्यांना कार्यालयात उपस्थित राहणे बंधनकारक असताना अनेक कर्मचारी कार्यालयीन वेळेत येत नाही व जात नाही, हदगाव पंचायत समिती ही जिल्ह्यात अनेक कारणामुळे चर्चेत असून येथील गट विकास अधिकारी यांच्या पंचायत समिती कर्मचारी यांच्यावर कोणताही वचक नसल्याचे स्पष्ट होत आहे. हदगाव पंचायत समितीमधील बहुतांश कर्मचारी जिल्ह्याच्या ठिकाणावरून सोमवार किंवा शुक्रवार आठवडी बाजाराच्या दिवशी या दोन दिवस कार्यालयात येतात याच दिवशी कार्यालयातील कृषी, पशुसंवर्धन, बांधकाम, घरकुल, पंचायत लेखा विभाग, आस्थापना येथील अधिकारी विस्तार अधिकारी व लिपिक उपस्थित असतात. इतर दिवशी दौरा टाकून कोठे जातात कक्ष अधिकारी यांना ही माहीत नसते धक्कादायक बाब म्हणजे अनेक कर्मचारी तर कार्यालयात गैरहजर असुन हजेरी पत्रकावर विविध प्रकारच्या कारणे देऊन सह्या सुद्धा बघावयास मिळाले या भोंगळ कारभाराबद्दल अनेक लोकांनी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी या प्रकाराबाबत माहिती देण्यात आली, मात्र त्यांच्यावर कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने वेळ काढू कर्मचाऱ्यांचे चांगलेच फावले आहे. अशा कर्मचाऱ्यांवर आता कारवाई कोण करणार? असा संतप्त प्रश्न उपस्थित केला जात आहे,

# नांदेड तालूक्यातील विकास कामाचा दोन्ही आमदार यांनी घेतला आढावा

**दैनिक वादळ वार्ता**
**नांदेड । प्रतिनिधी**



नांदेड तालुक्यात शासकिय कामे प्रामुख्याने तात्काळ निकाली काढण्यासाठी नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बालाजीराव कल्याणकर व नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आमदार आनंदराव तिडके बोंढारकर यांच्या अध्यक्षेखाली तालूक्यातील सर्व तालुका स्तरीय अधिकारी,तालूका कार्यालय प्रमुख विभाग यांचा महत्वाच्या विषयावर आढावा घेतला व अंमलबजावणी करण्याच्या सुचना दिल्या.विशेषता मुख्यमंत्री बळीराजा शेत/ पाणंद रस्ते, अन्न नागरी पुरवठा, सामाजिक सुरक्षा योजना,पाणी टंचाई,डखठ, वीज पुरवठा , कृषी विषयक बाबी,खत बी बियाणे पुरवठा,छत्रपती शिवाजी महाराज महाराज्यस्व शिबिर अभियान,नैसर्गिक आपत्ती अनुदान,विशेष सहाय्य अनुदान वाटप,ई फेरफार,जलजीवण पाणीपुरवठा,महावितरण,कायदा व सुव्यवस्था अदि विषयावर आढावा घेतला दोन्ही आमदार महोदयांनी उपस्थित अधिकाऱ्यांना चांगले व व्यवस्थित काम करण्याची सूचना दिली नांदेड तालुक्यामध्ये कोणतीही अडचण येऊ नये असे पहावे व इतर काही अडचण असल्यास आमच्याशी संपर्क साधावा असे सांगितले.बैठकिस उप विभागीय अधिकारी डॉ.सचिन खल्लाळ,तहसिलदार नांदेड संजय वारकड,उप विभागिय पोलिस अधिकारी नांदेड शहर,इतवारा ,गटविकास अधिकारी प्रविण सुरडकर,उप अधिक्षक भूमिअभिलेख,मृदणव जलसंधारण,तालूका कृषी अधिकारी,पुर्णा पाटबंधारे ,ग्रामीण पाणी पुरवठा,गट शिक्षण अधिकारी,पोलिस निरिक्षक शिवाजीनगर,लिंबगांव,नांदेड ग्रामिण, इतवारा, विमानतळ,नायब तहसिलदार सुनिल माचेवाड,संजय नागमवाड,नितिशकुमारनबोलेलू,इद्रजित गरड व तालूक्यातील लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

# हदगावात 'धरण उशाला अन् कोरड घशाला'; संतप्त शेतकऱ्यांचे तहसीलदारांना निवेदन,पाटबंधारे विभाग रामभरोसे

**दैनिक वादळ वार्ता**
**हदगाव । प्रतिनिधी**



हदगाव आणि हिमायतनगर तालुक्यातील पिकांची अवस्था बिकट झाली असून, पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर ऊर्ध्व पैनगंगा पाटबंधारे विभागाच्या ढसाळ कारभाराचा निषेध करत *शेतकरी संघर्ष समितीच्या* वतीने तहसीलदार आणि पाटबंधारे विभाग क्र. ४ ला तात्काळ कॅनॉलचे आवर्तन सुरू करण्याबाबत निवेदन देण्यात आले.

पाणी असूनही शेतकरी तहानलेला*
सध्या कडक उन्हामुळे तालुक्यातील उभी पिके जळून खाक होत आहेत, तर दुसरीकडे गुराढोरांच्या पाण्याचा प्रश्नही उग्र बनला आहे. प्रशासनाने केवळ ४ दिवस पाणी देऊन अचानक पुरवठा बंद केल्याने शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट आहे. धरण उशाला आणि कोरड घशाला अशी परिस्थिती येथील बळीराजावर ओढवली असल्याच्या भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

*पाटबंधारे विभागात अधिकाऱ्यांचा पत्ताच नाही! शेतकरी संघर्ष समितीचे पदाधिकारी जेव्हा पाटबंधारे कार्यालयात निवेदन देण्यासाठी पोहोचले, तेव्हा तिथे एकही जबाबदार अधिकारी उपस्थित नव्हता. अधिकारी कधी येतात आणि कधी जातात याचा कोणताही पत्ता नसल्याने, या कार्यालयाचा कारभार *'रामभरोसे'* सुरू असल्याचे चित्र पाहायला मिळाले. प्रशासकीय अनास्थेमुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत असल्याचा आरोप समितीने केला आहे.


*तीव्र आंदोलनाचा इशारा*
वरिष्ठ प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन पाण्याचे रोटेशन तात्काळ सुरू करावे, अन्यथा शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा यावेळी देण्यात आला.

*निवेदन देतेवेळी उपस्थित मान्यवर:*
यावेळी आत्माराम पाटील वाटेगावकर, नागोराव सूर्यवंशी, संदीप पालकर, संदीप काळबांडे, पवन मोरे, अविनाश मोरे, माधवराव जाधव, सचिन मोरे व इतर अनेक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्रमजीवीचा दणका;आदिवासी पाड्याची तहान भागणार, पाड्यात नवीन बोअरवेलला मंजुरी

**दैनिक वादळ वार्ता**
**पालघर । प्रतिनिधी**






वाडा:- गुहिर सांबरे पाडा येथे आज महिलांची पाण्यासाठी होणारी २ किलोमीटरची पायपीट पाहून श्रमजीवी संघटनेने आज प्रशासनाला धारेवर धरले. संघटनेच्या जिल्हा महिला प्रमुख रेखा पऱ्हाड आणि तालुका सचिव सुरज दळवी यांनी गटविकास अधिकाऱ्यांना पाड्यावरील भीषण वास्तवाची जाणीव करून दिली. संघटनेच्या या दणक्यानंतर प्रशासनाने तात्काळ भूमिका घेत ग्रामसेवकांना घटनास्थळी बोलावले आणि बोरवेल ला मंजुर करून घेण्यात आली आहे.

तालुक्यातील गुहीर-सांबरे पाडा येथे पाणीटंचाईने भीषण रूप धारण केले आहे. येथील महिलांना कडक उन्हात पाण्यासाठी मैलोन्मैल वणवण करावी लागते. हक्काचा नळ आधीच काढून घेतल्याने विहिरीतील दूषित आणि तळाला गेलेले पाणी भरण्याशिवाय या महिलांकडे पर्याय उरला नव्हता. ही बाब समजताच आज १७ एप्रिल रोजी श्रमजीवी संघटनेच्या जिल्हा महिला प्रमुख रेखा पऱ्हाड , तालुका सचिव सुरज दळवी आणि पदाधिकाऱ्यांनी सांबरे पाड्याला भेट दिली. यावेळी सांबरे पाड्यातील महिलांनी आपल्या अंगावर शहारे आणणाऱ्या व्यथा मांडल्या.पाड्यावरील महिलांच्या समस्या जाणून रेखा पऱ्हाड आणि सुरज दळवी यांनी तातडीने गटविकास अधिकारी गोवारी साहेब यांच्याशी संपर्क साधला. पाड्यावर पाणी नाही, लोक तहानेने व्याकुळ आहेत, प्रशासन झोपले आहे का? असा प्रश्न संघटनेने उपस्थित केला. संघटनेचा आक्रमक पवित्रा पाहून प्रशासनाने तातडीने ग्रामसेवक स्नेहल पाठारे यांना पाड्यावर पाठवले.ग्रामसेवकांनी प्रत्यक्ष विहिरीची आणि परिस्थितीची पाहणी केली असता, परिस्थिती अत्यंत गंभीर असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यानंतर संघटनेच्या रेट्यामुळे तिथे तात्काळ नवीन बोअरवेल घेण्याचे ठरले आणि बोरवेल मंजूर केली.

यावेळी तालुका उपाध्यक्ष बाळू लहांगे, शिवराम साळकर, रमेश वाघात, सांबरे पाडा गाव कमिटीच्या शुभांगी सांबरे यांच्यासह त्या गावातील महिला उपस्थित होते. श्रमजीवी संघटनेच्या या यशस्वी पाठपुराव्यामुळे सांबरे पाड्याचा अनेक वर्षांचा पाण्याचा प्रश्न सुटण्याच्या मार्गावर आहे.

# धार्मिक स्थळांचा विकास म्हणजे आत्मिक समाधानाचा सर्वोच्च क्षण–आ.सुधीर मुनगंटीवार

## धाबा तीर्थक्षेत्राला 'ब' वर्ग दर्जा,विकासासाठी भरीव निधी मंजूर केल्याबद्दल आ.मुनगंटीवार आणि आ.भोंगळे यांचा भव्य सत्कार



दैनिक वादळ वार्ता
**गोंडपिपरी । प्रतिनिधी**

धाबा (ता. गोंडपिपरी ) येथील श्री संत परमहंस कोंडया महाराज देवस्थानाला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रा स्थळ योजना अंतर्गत 'ब' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळवून देण्यात तसेच देवस्थानाच्या विकासासाठी ५० लाख रुपयांचा निधी मंजूर करून दिल्या बद्दल आमदार सुधीर मुनगंटीवार आणि आमदार देवराव भोंगळे यांचा भव्य सत्कार सोहळा भारतीय जनता पार्टीतर्फे दिनांक १५ एप्रिल २०२६ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या सोहळ्यामुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.या कार्यक्रमास आमदार सुधीर मुनगंटीवार, आमदार देवराव भोंगळे यांच्यासह भाजपा जिल्हा महामंत्री विवेक बोढे , अमर बोडलावार, दीपक सातपुते, किशोर अगस्ती, सुहास माडुरवार, विजय देशमुख, राजा चिलमंतवार, बबनराव पत्तीवार, राकेश पून, स्वप्निल अनमुलवार, इंद्रपाल घुळसे, निलेश पुलगमकर, सौ. वैष्णवी बोडलावार, नंदाताई घोगरे, अरुणाताई जांभूळकर, अश्विनीताई तोडासे, स्वातीताई वडपल्लीवार, बाबुराव बोमकंठीवार, भानेश थेगेवार यांच्यासह अनेक कार्यकर्ते व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी बोलताना आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी आपल्या भाषणात श्री क्षेत्र धाबाला 'ब' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळवून देण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा सविस्तर आढावा घेतला. धार्मिक स्थळांचा विकास म्हणजे केवळ पायाभूत सुविधा उभारणे नाही, तर त्या माध्यमातून समाजाला अध्यात्मिक बळ देणे होय. अशा कार्यातून मिळणारे आत्मिक समाधान हेच माझ्यासाठी सर्वात मोठे यश आहे, असे त्यांनी ठामपणे नमूद केले.आपल्या कार्यकाळातील विविध ऐतिहासिक व धार्मिक प्रकल्पांचा उल्लेख करताना त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकांच्या उभारणीपासून ते देशभरातील तीर्थक्षेत्रांच्या विकासापर्यंत अनेक कामांचा आढावा घेतला. शिखर शिंगणापूर, घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग, पंढरपूर येथील नामसंकीर्तन सभागृह, तुळशी वृंदावन उद्यान, श्रीशैलम येथे उभारण्यात आलेले ध्यानमंदिर, पाकिस्तानच्या बॉर्डर वर छत्रपती शिवाजी महाराजां अश्वारूढ putla उभारणे यांसारख्या प्रकल्पांचा त्यांनी उल्लेख केला. तसेच अफजलखानाच्या कबरीवरील अतिक्रमण हटविणे, शिवरायांची वाघनखे भारतात परत आणणे यांसारख्या ऐतिहासिक निर्णयांमुळे मिळालेल्या समाधानाचाही त्यांनी उल्लेख केला.राजुरा तालुक्यातील श्री सिद्धेश्वर मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी देखील निधी उपलब्ध करून देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. धाबा तीर्थक्षेत्राचा सर्वांगीण विकास, येथे येणाऱ्या भाविकांसाठी सोयीसुविधा आणि या परिसराचे धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व अधिक वृद्धिंगत करण्यासाठी मी सदैव कटिबद्ध राहणार आहे, अशी ठाम ग्वाही त्यांनी दिली.आमदार देवराव भोंगळे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, आमदार सुधीरभाऊ मुनगंटीवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आणि दूरदृष्टीमुळे या तीर्थक्षेत्रासाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध झाला आहे. या भागाचा लोकप्रतिनिधी म्हणून मी सुधीरभाऊंचा कार्यकर्ता म्हणूनच काम करत राहीन. त्यांच्या सहकार्याने या देवस्थान परिसराच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील राहणार आहे, असे आश्वासन त्यांनी दिले.या कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी या उपक्रमाचे मनापासून स्वागत करत, धाबा तीर्थक्षेत्राच्या विकासामुळे या भागातील धार्मिक पर्यटनाला चालना मिळणार असून स्थानिक अर्थव्यवस्थेलाही बळकटी मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रमाचा समारोप उत्साहपूर्ण वातावरणात झाला.

# जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांचा उद्या पुकारलेल्या संपावर बहिष्कार

## सर्व कर्मचाऱ्यांनी कर्तव्यावर हजर राहण्याचे आवाहन

दैनिक वादळ वार्ता
**जालना । प्रतिनीधी**

राज्य सरकारी कर्मचारी महासंघाच्या वतीने उद्या दि.२१ एप्रिल मंगळवार रोजी पुकारण्यात आलेल्या संपावर जालना जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाच्या वतीने बहिष्कार घालण्यात आला असून सर्व कर्मचाऱ्यांनी आपल्या कर्तव्यावर हजर रहावे असे आवाहन पदाधिकाऱ्यांनी केले आहे.राज्य सरकारी कर्मचारी महासंघाचे राज्याध्यक्ष विश्वास काटकर यांनी घेतलेल्या एकतर्फी निर्णयामुळे कर्मचारी संघटनांमध्ये उभी फूट पडली आहे. जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांकडे सातत्याने दुर्लक्ष करणे आणि जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाचे राज्याध्यक्ष उमेशचंद्र चूलबुले यांना विश्वासात न घेता संपाच्या नोटिसा काढणे, या प्रकारामुळे जालना जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाने २१ एप्रिलच्या संपावर पूर्णतः बहिष्काराचे हत्यार उपसले आहे. राज्य कर्मचारी महासंघाने पुकारलेल्या या संपातून जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांना जाणीवपूर्वक डावलले जात असल्याचा आरोप आता होऊ लागला आहे. विश्वास काटकर हे केवळ ठराविक संवर्गाचे नेतृत्व करत असून, ते जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांचा पाठपुरावा करण्यात पूर्णपणे अपयशी ठरले आहेत, असा गंभीर ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. याच नाराजीतून आता महाराष्ट्रातील जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाच्या पाठीशी उभे राहण्याचा निर्णय जालना येथील पदाधिकाऱ्यांनी घेतला आहे. जालना जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाच्या या निर्णयामुळे जिल्ह्यातील ग्रामपंचायत अधिकारी, प्रशासन विभाग, शिक्षक आणि सर्व संवर्गातील अधिकारी–कर्मचारी २१ एप्रिलच्या संपात सहभागी होणार नाहीत. विश्वास काटकर यांच्या कार्यपद्धतीचा निषेध करत, उमेशचंद्र चूलबुले यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून हा पवित्रा घेण्यात आला आहे. संपूर्ण महाराष्ट्रातील जिल्हा परिषद कर्मचारी या संपाकडे पाठ फिरवून आपले काम सुरू ठेवणार असल्याचे चित्र आता स्पष्ट झाले आहे.जिल्हा परिषद लेखा कर्मचारी संघटनेचे राज्याध्यक्ष मिलिंद कांबळे, महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियनच्या राज्य महिला उपाध्यक्ष दुर्गा भालके, जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाचे विभागीय उपाध्यक्ष प्रवीण पवार, जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष डी.बी.काळे, सरचिटणीस संजय चव्हाण यांनी सर्व कर्मचाऱ्यांना संपात सहभागी न होण्याचे आवाहन केले आहे. या निर्णयामुळे राज्य स्तरावर मोठी खळबळ उडाली असून, कर्मचारी चळवळीतील गटबाजी आता चव्हाट्यावर आली आहे. २१ एप्रिल रोजी जालना जिल्ह्यात संपाचा कोणताही परिणाम होणार नसल्याचे आता निश्चित झाले आहे. राज्य महासंघाचे नेतृत्व करतांना विश्वास काटकर यांनी जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या मागण्यांना केराची टोपली दाखवली आहे. महासंघाचे राज्याध्यक्ष उमेशचंद्र चूलबुले विश्वासात घेतले नाही त्यामुळे जिल्हा परिषदेतील कर्मचाऱ्यांमधून संतप्त प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. संपाचे राजकारण करणाऱ्यांना आम्ही साथ देणार नाही असा कडक पवित्रा घेत जालना जिल्ह्यातील सर्व विभागातील कर्मचाऱ्यांनी २१ एप्रिल रोजी आपल्या कर्तव्यावर हजर राहावे असे आवाहन जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# देगलूर येथील श्री समर्थ वाचनालयात महात्मा बसवेश्वर जयंती उत्साहात साजरी




दैनिक वादळ वार्ता
**देगलूर । प्रतिनिधी**

येथील श्री समर्थ वाचनालयात जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी मान्यवरांच्या उपस्थितीत बसवेश्वरांच्या कार्याचे स्मरण करून त्यांना अभिवादन करण्यात आले.

या सदरील कार्यक्रमाच्या सुरुवातीला महेश पाटील यांच्या हस्ते महात्मा बसवेश्वरांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करण्यात आला. १२ व्या शतकात अंधश्रद्धा आणि जातीयवादाला प्रखर विरोध करून मानवतेचा संदेश देणारे, 'अनुभव मंडप' या पहिल्या लोकसंसदेचे प्रणेते आणि 'कायकावे कैलास' (कर्म हेच दैवत) ही शिकवण देणाऱ्या बसवेश्वरांच्या विचारांची आजच्या काळात नितांत गरज असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.याप्रसंगी भगवानराव जाधव, ग्रंथपाल पुंडलिक कदम, सूर्यवंशी सर, कल्याणराव पाटील धानोरकर, दत्ता अमृतवाड, सुमित मानेकर, विठ्ठल पुठ्ठेवाड आदी मान्यवर उपस्थित होते.महात्मा बसवेश्वर जयंती आणि अक्षय तृतीया यांचे औचित्य साधून ग्रंथपाल पुंडलिक कदम यांनी वाचनालयात वर्षभरात राबविण्यात येणारे विविध उपक्रम आणि ग्रंथालयाच्या प्रगतीची माहिती उपस्थितांना दिली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सहाय्यक ग्रंथपाल दत्ता अमृतवाड यांनी केले.

# भांग्रापाणी येथे मंगळवार पासून संतोषी माता यात्रोत्सव

## सांस्कृतिक कार्यक्रम:दुर्गम भागात यात्रांचा हंगाम



दैनिक वादळ वार्ता
**रवींद्र वळवी । मोलगी**

सातपुड्यातील विविध गावांमध्ये यात्रोत्सवांचा हंगाम सुरू असून यात आदीवासी बांधव मोठ्या संख्येने सहभागी होत आहेत.दरवर्षी अक्षयतृतीया पासून सुरू होणाऱ्या भांग्रापाणी ता. अक्कलकुवा येथील यात्रोत्सवाला मंगळवारपासून प्रारंभ होणार आहे.

भांग्रापाणी येथील संतोषी माता मंदिरात यात्रोत्सवा निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहेत .१९८१ साली छत्रसिंग रुपसिंग वसावे यांच्या पुढाकाराने या ठिकाणी मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात आला होता.या भागातील भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या संतोषी मातेचा यात्रोत्सव दर वर्षी अक्षयतृतीयापासून सुरू होतो. यंदाही १९ तारखेपासून विविध पूजा या ठिकाणी चालू असून दि.२१ व २२ एप्रिल रोजी मुख्य यात्रोत्सवाला सुरवात होणार आहेत. तत्पूर्वी अनवरसिंग वसावे व शेवंताबाई वसावे यांच्या हस्ते अक्षयतृतीयाच्या दिवशी मुख्य पूजा करण्यात आली. असून पंचमीच्या दिवशी पूजन होऊन यात्रेला सुरवात होईल.येथे दर्शनासाठी तालुक्यातील विविध भागातील आदिवासी बांधव व महिला मोठ्या संख्येने या यात्रोत्सवात सहभागी होतात.दि.२१ पासून सुरु होणाऱ्या यात्रोत्सवा वाचा समारोप २३ रोजी करण्यात येणार आहे.या निमित्ताने सोंगाड्यापार्टी सह विविध सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत.१९९७ पासून मंदिर आणि यात्रोत्सवाचे आयोजन जय संतोषी माँ बहुउद्देशीय संस्था यांच्या कडून करण्यात येते. वडफळी ता. अक्कलकुवा येथील यात्रोत्सवा च्या समारोप आणि तळोदा येथील पाटी यात्रेचाही समारोपा नंतर भांग्रापाणी येथील संतोषी माता यात्रोत्सवाला सुरवात होते.

या यात्रोत्सवात विविध खाद्यपदार्थ व गृहपयोगी साहित्यांची खरेदी विक्री होते.वडफळी येथील यात्रोत्सवात गुजरात राज्यातील भाविकांची मोठ्या संख्येने हजेरी लावली जाते.व महादेव मंदिर येऊन भाविक आपले नवस फेडत असतात.त्याच प्राकारची गर्दी व नवस फेडण्याची प्रथा आणि गावांतील लोकांचे आरोग्य व सुखा या साठी यात्रोत्सवात पूजा करण्यात येते.

# नपचा बंद जलतरण तलाव तात्काळ सुरू करा; जलतरण संघटनेची मागणी

## विद्यार्थ्यांच्या सुट्ट्यांतही दुर्लक्ष;आंदोलनाचा इशारा

दैनिक वादळ वार्ता
**मुल । प्रतिनिधी**



मुल शहरातील नगर परिषदेकडील जलतरण तलाव बंद अवस्थेत असल्याने संताप व्यक्त करत जलतरण संघटनेने तो तात्काळ सुरू करण्याची मागणी केली आहे. विद्यार्थ्यांच्या उन्हाळी सुट्ट्यांमध्येही तलाव सुरू न केल्याने खेळाडू, विद्यार्थी व नागरिकांची मोठी गैरसोय होत असल्याचे संघटनेने नमूद केले आहे. या संदर्भात आपल्या क्षेत्राचे आमदार तथा माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात आला होता. त्यांच्या प्रयत्नातून जलतरण तलावासाठी निधी मंजूर झाला व लोकार्पणानंतर शहरातील नागरिक, महिला व विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर व्यायाम व सरावासाठी तलावाचा वापर करत होते. तसेच सिंदेवाही, सावली, पोंभुर्णा , गोंडपीपरी या परिसरातील विद्यार्थीदेखील स्पर्धेच्या सरावासाठी येथे येत असत. मात्र, मागील काही दिवसांपासून हा जलतरण तलाव पूर्णपणे बंद ठेवण्यात आल्याने तो केवळ शोभेची वास्तू बनल्याची टीका होत आहे. विशेषतः एप्रिल–मे महिन्यात शाळांना सुट्ट्या लागल्यानंतर तलावात विद्यार्थ्यांची गर्दी असायची; मात्र यावर्षी तलावाचे कुलूपही उघडण्यात आलेले नाही. याबाबत नागरिकांकडून वारंवार विचारणा होऊनही नगर परिषद पदाधिकारी व प्रशासनाकडून कोणतीही ठोस दखल घेतली जात नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. दरम्यान, जलतरण संघटनेच्या वतीने मुख्याधिकारी संदीप रोडे यांना निवेदन देण्यात आले असून, तलाव तातडीने सुरू न केल्यास नगर परिषदेला जागे करण्यासाठी आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.निवेदन देताना किशोर कापगते, संजय चिंतावार, प्रवीण मोहूर्ले, प्रमोद कोकुलवार, निलेश रायकांठीवार, राजेश व्यास, गौतम जीवने, रज्जू कुरेशी आदींची उपस्थिती होती.

# भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम राष्ट्रीय जीवनगौरव पुरस्कार २०२६ श्री सुनील श्रीरंग ढमाळ यांना प्रदान

दैनिक वादळ वार्ता
**खंडाळा । प्रतिनिधी**

ए. डी. फाउंडेशन महाराष्ट्र राज्य या संस्थेच्या माध्यमातून समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम राष्ट्रीय जीवनगौरव पुरस्कार २०२६ देऊन गौरव करण्यात आला. समाजासाठी सातत्याने कार्य करणाऱ्या महान व्यक्तींच्या कर्तृत्वाचा सन्मान व्हावा, त्यांना प्रोत्साहन मिळावे आणि त्यांच्या कार्यातून इतरांनाही प्रेरणा मिळावी या उद्देशाने हा राष्ट्रीय पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. शनिवार दिनांक ११ एप्रिल २०२६ रोजी दुपारी ३ वाजता पुणे स्वारगेट येथील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सभागृहामध्ये अत्यंत उत्साहपूर्ण, दिमाखदार वातावरणात संपन्न झालेल्या या सोहळ्यात विविध सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व सेवाभावी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांना मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी व सन्मानपत्र देऊन गौरवण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून आयकर आयुक्त मुंबई डॉ. सचिन मोटे, भारत विभूषण पंजाब सरकार श्री दिगंबर तायडे, सहाय्यक पोलीस आयुक्त पुणे सौ. रुक्मिणीताई गलांडे, सहाय्यक पोलीस आयुक्त श्री राम मांडुरके व अध्यक्ष अशोक गोरड उपस्थित होते. यावेळी ए. डी. फाउंडेशनच्या सकारात्मक विधायक व सातत्यपूर्ण वाटचालीबद्दल सर्वच मान्यवरांनी कौतुक केले.

तसेच व्यासपीठावरील प्रमुख पाहुणे आयकर आयुक्त मुंबई डॉ. सचिन मोटे आणि इतर मान्यवरांचे स्वागत आणि प्रास्ताविक फाउंडेशनचे अध्यक्ष अशोक गोरड यांनी केले.

उद्योग, सेवाभाव आणि सुसंस्कृत दृष्टिकोन या तीन आधारांवर उभे असलेले व्यक्तिमत्व म्हणजे मु. पो. पारगाव. ता. खंडाळा येथील श्री सुनील श्रीरंग ढमाळ. उद्योग क्षेत्रात कार्यरत असलेले सुनील ढमाळ यांची प्रामाणिकता, जनतेशी असलेला थेट संवाद आणि व्यवसायिक विकासात्मक दृष्टिकोनामुळे लोकांचा ठाम विश्वास त्यांनी संपादन केला आहे. सुनील ढमाळ साहेब यांचा प्रामाणिकपणा आणि निर्णयक्षमता यामुळे त्यांना खंडाळा तालुक्यामधील सर्वसामान्य नागरिकांमध्ये आदराचे स्थान आहे. त्यांच्या कामातून आजही अनेक युवक प्रेरणा घेतात आणि व्यवसायिक मार्गावर पाऊल टाकत आहेत. अनेकांना त्यांनी व्यवसायिक मार्गदर्शन करून स्वावलंबी बनवले आहे. त्यांच्या याच कार्याची दखल घेऊन आदर्श उद्योगरत्न म्हणून भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम जीवन गौरव पुरस्कार २०२६ देऊन त्यांना गौरवण्यात आले.

कार्यक्रमात निवड झालेल्या सर्व पुरस्कार्थींना मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी व सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ए. डी. फाउंडेशन समूहाच्या संपूर्ण टीमने विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नम्रता बागरेचा यांनी प्रभावीपणे करुन उपस्थित मान्यवरांचे आभार मानले. हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला असून समाजातील महान व्यक्तींच्या कर्तृत्वाला सलाम करणारा, प्रेरणादायी सोहळा ठरला.



# माजलगाव येथील बालाजी मंदिरात 'जिज्ञासा' समरकँप उत्साहात संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**माजलगाव | प्रतिनिधी**

शहरातील बालाजी मंदिरामध्ये माहेश्वरी महिला मंडळाच्या वतीने लहान मुलांसाठी १० दिवसीय 'जिज्ञासा' समरकँप उत्साहात पार पडला. न कोई पहला, न कोई आखिरी, हर चमक है जरूरी या अभिनव संकल्पनेवर आधारित या शिबिरात स्पर्धाविरहित वातावरण ठेवण्यात आले होते. त्यामुळे प्रत्येक मुलाला मोकळेपणाने आपली कला, कल्पकता आणि सहभाग व्यक्त करण्याची संधी मिळाली.या समरकँपचे आयोजन मंडळाच्या अध्यक्षा अलकनंदा मानधने, सचिव अनिता मुंदडा, कोषाध्यक्ष सुरेखा जेथलीया, सहसचिव सुगना तेला, सहकोशाध्यक्ष किरण कासट व संघटन मंत्री रत्नमाला इंदाणी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

दररोजच्या सत्राची सुरुवात श्लोक व प्रार्थनेने होत होती. रत्नमाला इंदाणी यांनी विविध गाण्यांच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धन, पाणी बचत, आरोग्यदायी आहार, प्लास्टिकमुक्ती, जगा आणि जगू द्या यांसारख्या मूल्यांवर मुलांना मार्गदर्शन केले. डॉ.सौ.राधिका बजाज व सौ.अनिता लोहिया यांनी ध्यान, योग व झुंबा नृत्याचे प्रशिक्षण दिले. कुमारी मानसी मानधने यांनी आर्ट अँड क्राफ्टचे मार्गदर्शन केले, तर प्रियंका भुतडा, अंकिता भुतडा, जयश्री लड्डा, सुप्रिया मालानी व सेजल मुंदडा यांनी बोधकथा व विविध खेळांद्वारे मुलांचे मनोरंजन व शिक्षण केले.

सौ.भाग्यश्री करवा यांनी गमतीशीर विज्ञान प्रयोग सादर करून मुलांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण केली. डॉ.सौ.करुणा मोदाणी यांनी मुलांची निःशुल्क आरोग्य तपासणी केली. शिबिरादरम्यान रोज विविध अन्नदात्यांकडून मुलांसाठी नाश्त्याची व्यवस्था करण्यात आली. स्नेहल कासट यांनी संपूर्ण शिबिराचे व्हिडिओ चित्रीकरण केले.समारोप कार्यक्रमात शिबिरासाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रत्नमाला इंदाणी यांनी केले. यावेळी तालुका माहेश्वरी सभेचे नवनिर्वाचित अध्यक्ष विनोद बजाज, सचिव पुरूषोत्तम करवा, ज्येष्ठ समाजसेवक गोपीकिशन इंदाणी, डॉ.सुशील लोढा, विष्णुदास मुंदडा, सचिन रेहदासनी व डॉ.सौ.निर्मला बजाज यांची प्रमुख उपस्थिती होती.या समरकँपमुळे मुलांमध्ये आत्मविश्वास, सर्जनशीलता आणि सामाजिक मूल्यांची जाणीव वाढीस लागल्याचे पालकांनी समाधान व्यक्त केले.



# केजचे भूमिपुत्र वैरागे यांना 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर संविधान अमृत महोत्सव गौरव पुरस्कार २०२६' जाहीर

## सातत्यपूर्ण सामाजिक कार्याचा विशेष गौरव

दैनिक वादळ वार्ता

**केज | प्रतिनिधी**

केज येथील भूमिपुत्र अनिल लिंबाजी वैरागे यांना संगीत क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर संविधान अमृत महोत्सव गौरव पुरस्कार २०२६' जाहीर करण्यात आला आहे. आशादीप महिला आधार मंच या सामाजिक संस्थेच्या व 'लेक लाडकी' अभियानाच्या संयुक्त विद्यमाने भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवानिमित्त तसेच महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे.



अनिल वैरागे यांनी संगीत क्षेत्रात केलेले निस्वार्थ कार्य, त्यांची सातत्यपूर्ण सेवा व कला जपण्याचा ध्यास यांचा गौरव म्हणून त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. हा पुरस्कार सोहळा दिनांक ३ मे २०२६ रोजी मुंबई येथील परळ (पूर्व) येथे आयोजित करण्यात आला आहे.

या सोहळ्यास महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक व कवी नंदेश उमाप तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर आणि सेलिब्रिटी उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या हस्ते अनिल वैरागे यांना सन्मानित करण्यात येणार आहे.

या पुरस्काराची घोषणा होताच केज शहरासह रसिक श्रोते, मित्रपरिवार आणि विविध स्तरातून अनिल वैरागे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# महात्मा बसवेश्वर समतेचे दुत डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड

दैनिक वादळ वार्ता

**केज | प्रतिनिधी**



स्वानंद सार्वजनिक वाचनालय,आनंदगांव ता.केज जि.बीड येथे दि. १९ एप्रिल २०२६ रोजी महात्मा बसवेश्वर जयंती, श्री.परशूराम जयंती, अक्षयतृतीया निमित्त व्याख्यान,कविता लेखन व वाचन,बेडूक उड्या आदी सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले.

महात्मा बसवेश्वर हे समतेचे दूत होते असे प्रतिपादन डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले.प्रमुख व्याख्याते म्हणून आनंद भैय्या गायकवाड यांचे व्याख्यान झाले.कविता लेखन व वाचन स्पर्धेत यशवंत सौदागर,नम्रता गायकवाड,वेदिका गायकवाड,शिवम गायकवाड यांनी सहभाग घेतला तर बेडूक उड्या स्पर्धेत शिवम गायकवाड नम्रता गायकवाड,वेदीका गायकवाड,कृष्णा गायकवाड,यशवंत सौदागर,नंदिता गायकवाड यांनी सहभाग घेतला.प्रमुख पाहुणे म्हणून माजी सरपंच रामराजे गायकवाड, नारायणभाऊ गायकवाड,ए.बी. गायकवाड,संभाजी लवटे,कमलाकर साबळे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक, महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध वक्ते व परखड व्याख्याते प्राचार्य डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड हे होते.

आनंद भैय्या गायकवाड यांचे सुश्राव्य व्याख्यान झाले.कविता लेखन व वाचन स्पर्धेत यशवंत सौदागर यांचा प्रथम क्रमांक आला.बेडूक उडी स्पर्धेत यशवंत सौदागर प्रथम,नम्रता गायकवाड – द्वितीय तर वेदिका गायकवाड यांचा तृतीय क्रमांक आला.विजेत्यांना प्रमाणपत्र देवून डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड यांच्या हस्ते सन्मानीत करण्यात आले.

# भगवान श्री परशुराम जन्मोत्सवा निमित्त पेशवा प्रतिष्ठान अंबाजोगाई आयोजित रक्तदान शिबिरात ३२ जणांचे रक्तदान

दैनिक वादळ वार्ता

**अंबाजोगाई | प्रतिनिधी**

भगवान श्री परशुराम जन्मोत्सवानिमित्त पेशवा प्रतिष्ठान अंबाजोगाई यांच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिराचा कार्यक्रम उत्साहात पार पडला.या शिबिराचे उद्घाटन मकरंद सोनेसांगवीकर,डॉ. सुधीर धर्मपात्रे,ड. विश्वजित जोशी,विशाल जहागिरदार,संजय देशपांडे व अनिता औटी यांच्या उपस्थितीत करण्यात आले.या वेळी पेशवा प्रतिष्ठानचे पदाधिकारी,स्वयंसेवक तसेच रक्तदाते मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिबिरात एकूण ३२ जणांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली.तसेच,या उपक्रमा दरम्यान पेशवा प्रतिष्ठान च्या १५ पदाधिकाऱ्यांनी अवयवदानाचा संकल्प करून नोंदणी केली,ही विशेष उल्लेखनीय बाब ठरली.समाजामध्ये अवयवदानाबाबत जनजागृती व्हावी,या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राहुल कुलकर्णी यांनी केले.सूत्रसंचालन डॉ. संकेत तोरंबेकर यांनी केले,तर आभार प्रदर्शन डॉ.महेश अकोलकर यांनी मानले.या उपक्रमा मुळे समाजात रक्तदान व अवयवदानाबाबत सकारात्मक संदेश पसरला असून नागरिकांनी अशा उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवावा,असे आवाहन यावेळी मान्यवरांनी केले.या रक्तदान शिबिरात डॉ. महेश अकोलकर,डॉ. संकेत तोरंबेकर,पार्थ कुलकर्णी,सचिन भातलवंडे,प्रमोद नांदगावकर,विशाल जहागिरदार,स्वप्नील कुलकर्णी,डॉ.प्रिया मुळे,स्वप्ना देशपांडे, किशोर जोशी,राहुल कुलकर्णी,सारंग हिवरेकर,राघव कुलकर्णी,कविता किरण कुलकर्णी,किरण कुलकर्णी,वल्लभ पिंगळे,वामन खोत, वामन मुळी,वेदांत जोशी, अनघा अविनाश लहुरीकर,आश्लेषा कळंबकर,पार्थ देशपांडे, डॉ मयुर सोनवळकर, शेखर देशपांडे,आनंद जोशी, संभाजी केंद्रे, पवन गिरवलकर,प्रशांत पाठक,केदार वारकरी, कल्याणी कुलकर्णी, सागर दीक्षित,डॉ. कौस्तुभ कुलकर्णी रक्तदान केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी विवेक बाभुळगावकर, अक्षय देशमुख, गौरव कुलकर्णी, दीपक कुलकर्णी,सुजित दीक्षित, प्रणिता पोखरीकर,राजश्री पिंपळे, स्मिता भातलवंडे, मयुरी तोरंबेकर,रेणुका भालेराव,ऋतुजा कोंडपल्ले यांनी पुढाकार घेतला.



# चौसाळा ग्रामपंचायत कार्यालयामध्ये महात्मा बसवेश्वर व भगवान परसुराम यांची संयुक्त जयंती उत्साहात साजरी



दैनिक वादळ वार्ता

**बीड | प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील चौसाळा ग्रामपंचायत कार्यालयात महात्मा बसवेश्वर व भगवान परसुराम जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली. प्रथमतः चौसाळा ग्रामपंचायत सदस्य आमोल कांबळे, ग्रामपंचायत सदस्य मोहन शिंदे, भवानी ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष सुधाकर गुंजाळ, भगवान परसुराम सेनेचे अध्यक्ष प्रसाद देशमुख व चौसाळा पत्रकार संघाचे अध्यक्ष विवेक कुचेकर यांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले यावेळी कुमार मिटकरी, सचिन वैध, पत्रकार अमोल तांदळे,कैलास तोडकर, अक्षय काळे, गोटया देशमुख, सचिन खोबरे, गणेश राऊत,सर्वज्ञ सर यांच्यासह अंसख्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सौ.गीताभाभी पवार,प्राचार्य प्रो.रजनी शिखरे ,संगीता जोशी, प्रीती गर्जे, डॉ.राणी पवार यांना रोटरी क्लबचे आदिशक्ती स्त्री सन्मान पुरस्कार जाहीर


दैनिक वादळ वार्ता

**गेवराई | प्रतिनिधी**











कला ,क्रीडा, संगीत, आरोग्य, सांस्कृतिक ,सामाजिक , साहित्य आदी क्षेत्रात रचनात्मक कार्य करणाऱ्या रोटरी क्लब ऑफ गेवराई यांच्यावतीने आदिशक्ती स्त्री सन्मान पुरस्कार गेवराईच्या नगराध्यक्ष सौ.गीताभाभी पवार, प्राचार्य प्रोफेसर डॉ. रजनी शिखरे, प्रीती गर्जे , संगीता जोशी, प्रा .डॉ. राणी पवार यांना जाहीर करण्यात आले आहेत. २३ एप्रिल २०२५ रोजी स्थापन झालेल्या रोटरी क्लबच्या वतीने अवघ्या ९ महिन्यात ३० सामाजिक उपक्रम राबविण्यात आले . यात प्रामुख्याने दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी करिअर गायडन्स उपक्रम, कृषी दिनी वृक्षारोपण ,गुरुनानक जयंती रोजी रक्तदान शिबिर, दारोदारी थंडीमध्ये वृत्तपत्र वाटप करणाऱ्या तरुणांना उबदार स्वेटर्स तर वयोवृद्धांना ब्लँकेटचे वाटप, जि. प. प्रा. शाळा बोरगाव जुने अशा दुर्गम भागातील शाळेस विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी रंगीत संगणक संच, मौजे ताकडगाव येथे स्वच्छता अभियान ,गोंदी येथील पूरग्रस्तांना २०० अन्न पाकिटे वितरण ,मुखेड पूरग्रस्तांना पाच हजार रुपये आर्थिक मदत तर कॅन्सर रुग्णवाहिकेसाठी वेलफेअर फंडासाठी पाच हजार रुपयाची आर्थिक मदत, जिल्ह्यातील युवक आणि युवतीसाठी अभिनय कार्यशाळा, उमापूर जि. प. मा. शाळा , जि. प. कन्या प्रशाला गेवराई यांना रंगीत टीव्ही, हॅन्डवॉश मशीन, ग्रामीण भागातील ये जा करणाऱ्या ५ मुलींसाठी सायकल , ग्रंथालयाची पुस्तके ठेवण्यासाठी कपाट, महिला दिनाचे औचित्य साधून स्त्री पुरुष ,युवक युवतीसाठी मॅरेथॉन स्पर्धा, नागरिकांचे आरोग्य चांगले राहावे म्हणून आंतरराष्ट्रीय योगा दिन शिबिराचे आयोजन, शांतता मासानिमित्य योगा, प्राणायाम आणि ध्यानधारणा शिबिर, महापुरुषांच्या जयंतीनिमित्त निबंध लेखन स्पर्धा ,मराठी भाषा गौरव दिनानिमित्त सुंदर हस्ताक्षर स्पर्धा ,पर्यावरणीय चित्रकला स्पर्धा ,राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त विज्ञान प्रयोग प्रदर्शन, माजी सैनिक, ज्येष्ठ नागरिक, आदर्श शिक्षक , चार्टर्ड अकाउंटंट, कृषीनिष्ठ शेतकरी, सेवाजेष्ठ डॉक्टर्स, आपली लेखणी झिजवून जनसामान्यांचे प्रतिबिंब वृत्तपत्रातून मांडणारे ज्येष्ठ पत्रकार,गुणवंत विद्यार्थी यांच्या सेवा गौरवाचे कार्यक्रम, उत्कृष्ट गणेश मंडळांना शांतता, एकता, राष्ट्रीय एकात्मता व शिस्त या विषयावर पाच मंडळांना पारितोषिके, स्थानिक कलावंत व कवी यांना संधी म्हणून कोजागिरी पौर्णिमे दिवशी कवी संमेलन व दिवाळी पाडवा कालावधीत दीपोत्सव स्वरांजली हा सांस्कृतिक कार्यक्रम, जि. प. कन्या प्रशाला गेवराई येथे खास मुलींसाठी चांगला स्पर्श वाईट स्पर्श (गुड टच बॅड टच) उपक्रमाचे आयोजन तसेच गेवराई शहर व परिसरात होणाऱ्या चांगल्या गोष्टींचे कौतुक असे विविध उपक्रम रोटरी क्लब ऑफ गेवराईने अवघ्या नऊ महिन्यात ३० सामाजिक उपक्रम राबविले आहेत. मे महिन्यात गेवराई तालुक्यातील आपापल्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या सक्षम महिलांना आदिशक्ती स्त्री सन्मान पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. यामध्ये नगर परिषद अध्यक्षा सौ. गीताभाभी पवार (समाजकारण, राजकारण, आरोग्य), प्राचार्या प्रोफेसर डॉ रजनीताई शिखरे (शैक्षणिक), प्रीतीताई गर्जे (अनाथांची सेवा, सामाजिक), पार्श्वगायिका संगीता जोशी भावसार(संगीत क्षेत्र), डॉ राणी पवार राठोड (क्रीडा क्षेत्र) यांचा समावेश आहे. मे महिन्यात होणाऱ्या शानदार कार्यक्रमात रोटरी इंटरनॅशनल ३१३२ चे गव्हर्नर रो. सुधीर लातुरे, भावी प्रांतपाल जयेशभाई पटेल यांच्या हस्ते सदर पुरस्काराचे वितरण होणार असल्याची माहिती रोटरी क्लबचे अध्यक्ष प्रा.राजेंद्र बरकसे, सचिव रो.प्रवीण जैन यांनी दिली.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077